मटा अँकर

## समृद्धी महामार्गावर प्रयोग; नीलगाई, चिंकारा, रानडुक्कर, साळिंदर यांचा वावर

# उड्डाणपुलावरून प्राण्यांचे मार्गक्रमण यशस्वी !

चिन्मय काळे

chinmay.kale@timesgroup.com



### ११ प्रकारच्या १,७९७ उपाययोजना

वन्यजीवांना त्रास न होण्यासाठी समृद्धी महामार्गावर ११ प्रकारच्या १,७९७ उपाययोजना करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये सात प्राणी उड्डाणपूल, सात रस्त्याखालील जंगले व दोन बोगद्यांचा प्रामुख्याने समावेश आहे. उर्वरित उपाययोजना लहान स्वरूपाच्या आहेत.

मुंबई : अभयारण्य व डोंगर यांच्यामधून मार्ग काढताना वन्यजीवांचा संवाद तुटू नये यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) समृद्धी महामार्गाच्या निमित्ताने राज्यात पहिल्यांदाच प्राण्यांसाठी उड्डाणपूल व बोगदाही निर्माण केला आहे. यापैकी बोर अभयारण्यातील उड्डाणपूल हा देशातील सर्वाधिक रुंदीचा 'ॲनिमल ओव्हरपास' आहे. त्यावरून आता प्राण्यांचे मार्गक्रमण सुरू झाले आहे.

हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गाचा ६०० किमी लांबीचा मार्ग भरविर खुर्द (सिन्नर) ते शिवमडका (नागपूर) असा सुरू झाला आहे. यादरम्यान वर्धा जिल्ह्यात बोर अभयारण्याचा भाग आहे. तेथे जंगलाला छेदून हा महामार्ग तयार करण्यात आला आहे. त्या (पान ९वर)

# उड्डाणपुलावरून प्राण्यांचे मार्गक्रमण यशस्वी!

**(जोड पानावरून)** ठिकाणी वन्यजीवांच्या अधिवासाला धक्का बसू नये यासाठी जमिनीपासून १३ मीटर उंचीवर विशेष प्राणी उड्डाणपूल उभा करण्यात आला आहे. त्याची रुंदी (६० मीटर) व लांबी (९३ मीटर) देशात सर्वाधिक आहे. ॲफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीने खडकी आमगाव ते पिंपळगाव यादरम्यानच्या ५८ किमीच्या बांधकामात प्राण्यांसाठी हा मार्ग तयार केला असून, त्यावर हरीण, चितळ, बिबट्या कॅमेऱ्यात दिसले आहेत.

प्राण्यांच्या या हालचालींवर देखरेखीसाठी 'एमएसआरडीसी'ने भारतीय वन्यजीव संस्थेशी मागील वर्षी करार केला होता. या संस्थेने देखरेखीसाठी अशा प्राण्यांचा वास असलेल्या व त्यासाठी योजलेल्या विविध उपाययोजनांच्या भागात ६४ कॅमेरे बसविले होते. त्या कॅमेऱ्यांनी सर्वच ठिकाणी प्राण्यांच्या हालचाली टिपल्या आहेत. त्यामध्ये नीलगाई, चिंकारा, रानडुक्कर, साळिंदर (पोर्क्युपाइन), चौसिंगा, काळवीट, लांडगा, कोल्हा, बिबट्या, मुंगूस यांचा वास दिसून आला आहे.

'या प्रकारच्या सर्वेक्षणात आणखी सकारात्मक निकाल दिसू शकतात. यातील निकाल राज्यातील सर्वच महामार्गांवर उपाययोजना महत्त्वाच्या ठरतील', असे मत मुख्य वन्यजीव संवर्धक महीप गुप्ता यांनी व्यक्त केले.

भारतीय अ